म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल वाङ्मय
दा. क्र. ६३२६
वा. क्र.

IRBK-0106326
IRBK-0106326

3 NOV 1977

वा. क्र. ६३२६

६३२६

आ: पा:

# “ राजाची लेक माझी बाऽऽयकू ”


असें ‘ कुकूचकू ’ करून ओरडणाऱ्या कोंबडेदादाची गोष्ट तुम्हीं ऐकली असेल. आतां राजाच्या लेकीला आपली बायको करणाऱ्या उंदिरमामांचीही गोष्ट वाचलीत. मामांची फजिती वाचून तुम्हांला म्हातारीच्या अंगणांतील बोरं चोरून खाणाऱ्या कोल्हेदादांचीही आठवण झाली असेल व तुम्हीं पोट धरधरून हंसला असाल.

तुम्हांला अशा गोष्टी खूप आवडतात ना! अशाच गोष्टी वाचायला द्या म्हणून तुम्ही बाबांच्या मागें लागतां नि मग ते रागावतात. कामाच्या गर्दींत उंदिरमामांच्या गोष्टी आणून द्यायला त्यांना सवड कुठें असते? आणि हीं पुस्तकं धुंडाळत त्यांनीं तरी कुठं कुठं हिंडायचं. पण त्यांना तुम्हीं पुस्तकांचीं नांवं सांगितलींत तर ते तुम्हांला आनंदानें हवीं तीं पुस्तकं आणून देतील. खालीं दिलेली यादी त्यांना दाखवा आणि शिवाय संपूर्ण यादीही मागवायला सांगा.


| | | | |
|---|---|---|---|
| उंद्रांची सभा, खंडाळीकर | ०–८–० | तीन पढतमूर्ख, काटदरे | ०–६–० |
| वाघाची मावशी, द. के. बर्वे | | बोलका शंख, कावेरी कर्वे | ०–२–६ |
| गर्विष्ठ एंजिन, स्नेहलता भेंडे | ०–४–० | बोलके पक्षी, इंदू पाठक | ०–७–० |
| गाय आणि कावळा, कावेरी कर्वे | ०–४–० | मन्या व बन्या, कारखानीस | ०–४–० |
| डोक्याच्या आणि बिनडोक्याच्या गोष्टी, अभ्यंकर | ०–८–० | प्राणीगांवच्या मौजा, आपटे | ०–८–० |
| | | बिचारा कोकीळ, सौ० कर्वे | ०–४–० |
| तिस्मरखां, पालवणकर | ०–४–० | अकलेचा कांदा, द. के. बर्वे | ०–६–० |

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

म. ग्रं. सं. ठाणें
विषय बा. वा.
सं. क्र. १५०४




IRBK-0106326
IRBK-0106326




# उंदिरमामाचें लग्न

लेखक

दत्तात्रेय केशव बर्वे, बी. ए., बी. टी.

श्री ग्रंथ संग्रहालय, ठाणे

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

मूल्य २० नये पैसे

# गमतीच्या गोष्टी

## भाग १ ते ४

लेखक — वि. कृ. नेरूरकर, बी. ए.

मूल्य प्रत्येकीं ६ आणे

# नवलकथा

## भाग १ ते ३

लेखक — गो. वि. रानडे, बी. एस्सी.

मूल्य अनुक्रमें ३–४–८ आणे

# मौजेच्या गोष्टी

## भाग १ ते ३

लेखक — वैद्य; शेख — गुरव — पाटील; वीरकर

मूल्य अनुक्रमें ४–४–५ आणे

# थोरांच्या गोष्टी

## भाग १ ते ३

लेखक — ग. म. वैद्य, एम्. ए.

मूल्य अनुक्रमें १०–१२–१४ आणे


सर्वाधिकार प्रकाशकाधीन

पहिली आवृत्ति: १९४१ दुसरी आ. : १९४५ तिसरी आ. : १९५० चौथी आ.: १९५७

मुद्रक: श्री. बा. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक: केशव भिकाजी ढवळे, कर्नाटक हाउस, मुंबई, २

# “ शुभ मंगल सावधान ! ”

**बाल मित्र-मैत्रिणींनो,**

दामले ह्या नांवाचे माझे एक मित्र आहेत. त्यांना पांडू नांवाचा एक मोठा गोडबोल्या मुलगा आणि द्वारका नांवाची एक खठ्याळ मुलगी आहे. हीं दोन मुलें मला दररोज, “ च्याच्या, गोष्ट सांगा ना छानशी. ” म्हणून भंडावून सोडीत. एकदां आमच्या घरावरून एक लग्नाची वरात वाजत चालली होती. ती पाहून त्या रात्रीं मुलें म्हणालीं, “ च्याच्या, आज आम्हांला लग्नाची गोष्ट हवी. ”

मग मला एकदम ‘ स्फूर्ति ’ आली आणि मीं त्यांना ही ‘ उंदिरमामाच्या लग्ना’ची गोष्ट सांगितली.

‘ बालबोधमेवा ’ नांवाचें तुम्हां लहान मुलांसाठीं एक मासिक नाशिकचे श्री. देवदत्त टिळक, वकील काढीत असतात. लहान मुलांच्यासाठीं गोष्टी लिहिण्यास त्यांनींच मला वेळोवेळीं प्रोत्साहन दिलें आहे. म्हणून मी त्यांचे कृतज्ञतेनें आभार मानतों.

वास्तविक ‘ उंदिरमामाचें लग्न ’ गेल्या वर्षींच व्हावयाचें पण तसा योग नव्हता. आज सुद्धा केवळ श्री. ढवळे ह्यांनींच ‘ मामाचें लग्न ’ करावयाचें ठरविल्यामुळेंच हें शुभमंगल घडून येत आहे. ह्याबद्दल श्री. ढवळे ह्यांचे कितीही आभार मानले तरी ते कमीच पडतील आणि कदाचित् आभाराचा शिष्टाचार त्यांना आवडायचाच नाहीं.

उंदिरमामाच्या लग्नांतील ‘ लाडूपोळ्या ’ तुम्हां मुलांना आवडतील अशी मला आशा आहे.

तुमचा मित्र

**दत्तात्रेय केशव बर्वे**

*जॉर्ज हायस्कूल, वेंगुर्लें, ता. १० जानेवारी, १९४१*

सून आणल्याखेरीज घरींच परत येणार नाहीं. हा मी चाललों घर सोडून." असें म्हणून आपल्या बिळांतून उंदिरमामांनीं टुणकन् रस्त्यावर उडी मारली आणि ते सडकेवरून दुडदुड धावूं लागले.

एका कुंपणाजवळ एक फळकुटी पडली होती. तिचा कांहींतरी उपयोग होईल असें वाटून त्यांनीं ती फळकुटी आपल्या हातांत घेतली.

★

२

पुढें ते एका झाडापाशीं आले. त्या झाडाखालीं एक मनुष्य चूल फुंकीत बसला



होता आणि त्याचीं चारपांच मुलें भुकेनें रडत होतीं.

"काय रे, काय करतो आहेस तूं?" उंदिरमामांनीं विचारलें.

"विस्तव पेटवतों आहें, पण लाकडें ओलीं आहेत. विस्तव पेटत नाहीं. मुलांना भूक लागली आहे." त्या मनुष्यानें उत्तर दिलें.

"मग ही वाळलेली फळकुटी घाल चुलींत म्हणजे लवकर विस्तव पेटेल." असें म्हणून उंदिरमामांनीं ती फळकुटी त्या मनुष्याला दिली. ती वाळलेली फळकुटी त्यानें चुलींत घातली. त्याबरोबर 'भकाभक्' विस्तव पेटला. त्या मनुष्यानें भाकरी करून मुलांना खाऊं घातली. उंदिरमामांनीं आपणावर उपकार केल्याबद्दल त्यानें त्यांनाही एक भाकरी दिली.

"बरं झालं बुवा, माझी पांच दिवसांची पोटाची काळजी दूर झाली." असें म्हणून उंदिरमामांनीं भाकरी तोंडांत धरली आणि ते वाटेला लागले.


थोड्याच वेळांत ते दगड्या कुंभाराच्या घरापाशीं आले. कुंभाराचीं दोन लहान मुलें दारांतच रडत बसलीं होतीं.

"कुंभारदादा, कुंभारदादा, तुझीं मुलं कां रे रडत आहेत?"

"काय सांगूं उंदिरमामा, त्यांची आई गेली आहे पीठ दळून आणायला. पण या मुलांना मुळीं धीर नाहीं. फार भूक लागली आहे त्यांना."

"मग दगड्या, असं कर. ही घे भाकर आणि घाल मुलांना खायला. खा रे मुलांनो ही ताजी कुरकुरीत भाकर."

उंदिरमामांनीं आपली भाकर दगड्या कुंभाराच्या मुलांना दिली. ती खाऊन मुलें पुनः आनंदानें नाचूं बागडूं लागलीं. दगड्याला फार संतोष वाटला. गाडग्यांच्या ढिगांतून एक चांगलें नक्षीदार गाडगें त्यानें



उंदिरमामांना दिलें. “ मामासाहेब, ही घ्या माझी गरिबाची लहानशी देणगी. ”

“ बरं असो. कशाला तरी उपयोगी पडेल हें भांडें. येतों मी आतां. ” असें म्हणून उंदिरमामा तुरुतुरु चालूं लागले.

दगड्यानें हसत विचारलें, “ मामा, मामा, चाललांत कुठं ? ”

“ मी लग्नाला चाललोंय् ” उंदिरमामा छाती फुगवून म्हणाले. दगड्याला हसें आवरेना. दगड्याचीं मुलें नाचून बागडून गाऊं लागलीं.



“ माझ्या मामाचं ऽ ऽ लगीन
वऱ्हाडी कोण कोण जाणं
माझ्या मामाचं लगीन ”

★

# ३

वेशीच्या जवळ गेल्यावर उंदिरमामांना एक गवळी भेटला. तो म्हशीची धार काढीत होता. पण तो कांहीं भांड्यांत दूध काढीत नव्हता, तर आपल्या टोपींतच दूध काढीत होता.

उंदिरमामांना तें पाहून मोठी मौज वाटली. “ एऽहे रे वेड्या, टोपींत का कोणी दूध काढतात ? ”



म. श्री. सं. ... ग्रंथालय ...
वा. क्र. ...९३२८ नों. दि.

" मामा, मला फार भूक लागली आहे आणि माझ्याजवळ एकही भांडं नाहीं. "

"अरे, त्याची कां तुला काळजी. मी देतों तुला भांडं. पण काय रे, तूं मला काय देशील?"

" एक घोटभर दूध देईन. "

" मला नको बुवा दूध. "

" मग काय हवं तुला ? " त्यानें उंदिरमामांना विचारलें.

क्षणभर विचार करून उंदिरमामा उत्तरले,

" हं, सांगूं ? मला तुझी म्हैस हवी. पहा देतोस का ? देत असलास तर देईन हें छानसं भांडं. "



चिमुकल्या बिळांत राहाणारा पिटुकला उंदीर म्हैस मागतो याची त्या मनुष्याला मोठी गमत वाटली. पण उंदराची केवळ थट्टा करण्यासाठीं तो उंदिरमामांना म्हणाला, " हो, हो, देतों म्हैस. "

मग उंदिरमामांनीं त्याला भांडें दिलें आणि त्या मनुष्यानें त्या भांड्यांत दूध काढून घेतलें.


मग उंदिरमामा म्हणाले, " हं गवळी-दादा, दे आतां म्हैस. "

गवळी हसून म्हणाला, " अहो उंदिर-मामा, लई शहाणे दिसतां कीं तुम्ही. तुम्ही म्हैस कशी नेणार ? कुठं नेणार ? त्यापेक्षां दुसरं कांहीं तरी मागा. "

“ मला ती म्हैसच हवी. ”

“ एवढ्याशा भांड्यासाठीं मी म्हैस मुळींच देणार नाहीं.”

मग गवळीदादाचें आणि उंदिरमामांचें कडाक्याचें भांडण जुंपलें. तो गवळी म्हैस देईना आणि उंदिरमामा आपला हट्ट सोडीनात. शेवटीं तो गवळी एक दगड घेऊन त्याच्या अगदीं प्राणांवरच उठला. पण धूर्त उंदिरमामांनीं तितक्यांत त्याच्या मानेवर उडी मारून त्याच्या मानगुटीस कडकडून चावा घेतला. तो गवळी कळवळून भुईवर पडला. उंदिरमामांनीं संधि साधली. म्हशीचें दावें त्यांनीं आपल्या हातांत घेतलें आणि “ रामराम, गवळीदादा ” असें म्हणत छाती फुगवून म्हशीसह उंदिरमामा वाटेला लागले.



★

## ४

चालतां चालतां संध्याकाळ झाली. आतां उंदिरमामा बरेच दमले होते. म्हणून त्यांनीं एका झाडाच्या बुंध्याला दावें गुंडाळून म्हैस बांधून ठेवली आणि "हुश्शऽऽ" करीत एका बिळाच्या द्वाराशीं ते विश्रांति घेत पडले.

सुमारें दोन प्रहर रात्र झाल्यावर कांहीं लोक हातांत मशाली घेऊन तेथें आले. उंदिरमामा त्यांच्याकडे कुतूहलानें पाहूं लागले. त्या लोकांनीं त्याच झाडाखालीं आपला तळ ठोकला. त्यांच्या बोलण्यावरून ते सर्वजण बरेचसे दमलेले व भुकेलेले आहेत हें उंदिरमामांनीं तेव्हांच ओळखलें आणि उंदिरमामांना आनंदीआनंद होण्यासारखी आणखी एक गोष्ट त्यांच्याकडे होती. त्यांच्याबरोबर एक पालखी होती. "त्या पालखींत कोण बरं असेल ? तसली एखादी गोरीपान मुलगी तर नसेल ?" असा विचार उंदिरमामांच्या मनांत सारखा घोळूं लागला.

त्या लोकांच्यापैकीं एकजण म्हणत होता, "कसलं हो महाराजांच्या घरचं लग्न. आम्ही गडी माणसं असलों म्हणून आम्हांला पोळीचा आणि लाडवाचा तुकडा सुद्धा दाखवूं नये ? इतके बडेबडे बामण

लोक लाडूपोळ्या झोडीत होते आणि आमच्या वांटणीला मात्र तो फळफळीत भात आणि पचपचीत आमटी. जशीं काय आम्ही जनावरंच. ”

“ अरे गड्या, शीरीमंत म्हणजे लई वाईट. तुला इतकं तरी अक्षी खायाला मिळालं; पण मी म्हातारा बापडा सकाळ-पासुनशान् सारखं राबतुया. पन मला कोनी चिलीम ओढ म्हनलं असेल तरी बी शपथ. या म्हाताऱ्याच्या पोटांत दुपारच्यान् अन्नाचा कण बी नाहीं अक्षी. ”

तिसरा म्हणाला, “ हें पहा गड्यांनो, मी तर या महाराजांच्या नोकरीला अगदीं कंटाळून गेलों आहें. ही पालखी येथेंच टाकून पळून जाऊं या आपण. ”

आणखी एकजण म्हणाला, “ अरे गड्यांनो, तांदूळ तरी शिजवून खाऊं आधीं. मग पुढचं पुढं. ”

उंदिरमामा आपल्या बिळांत बसून हें सगळें संभाषण ऐकत होते. त्यांनीं विचार केला, “ आज आपलं नशीब उघडल आहे खास. आज एका फळकुटीवर आपण म्हैस मिळविली. पण आतां मात्र धाडस करून आणखी कांहीं तरी मोठें मौल्यवान बक्षीस मिळविण्याची संधि आली आहे. ”

असा विचार करून उंदिरमामा त्या लोकांजवळ जाऊन म्हणाले, “ बाबांनो, तुमचं सारं बोलणं मीं ऐकलं. तुम्ही फार दमलेले आणि भुकेलेले दिसतां. तेव्हां माझ्याकडून कांहीं तरी मदत होईल असं वाटून मी येथें आलों आहें. पहा माझी मदत घ्यायची आपली इच्छा असेल तर.”

त्या लोकांना मोठा अचंबा वाटला. टीचभर उंदीर तो आपल्याला काय मदत देणार, याचा त्यांना उलगडा होईना.

“ पण उंदिरमामा, काय मदत देणार आहांत तुम्ही ? ”



“ एक मोठं जनावर देईन मेजवानीला.” उंदिरमामा रुबाबांत बोलले.

“ कोणतं जनावर, मांजरी कीं बोका ? ” टिंगल करण्याच्या उद्देशानें एकजण बोलला.

“ ए ऽ गड्या, याद राखून थट्टा कर या उंदिरमामाची. सामान्य उंदीर नाहीं हा ! समजलास. बरं हें पहा, तुम्हांला एक भली लठ्ठ म्हैस देणार आहें मी ! ” असें म्हणून पलीकडच्या झाडाला बांधलेली म्हैस उंदिरमामांनीं त्यांना दाखविली.

मांसाहार करणाऱ्या त्या भोई लोकांच्या तोंडाला ती म्हैस पहातांच पाणी सुटलें. मग उंदिरमामा गंभीर चेहेरा करून म्हणाले,

" पण मग या म्हशीचा मोबदला म्हणून तुम्ही मला काय देणार ?"

" आज आमच्याकडेच मेजवानीला या म्हणजे झालं." त्या लोकांचा म्होरक्या दादू म्हणाला.

" छेः, छेः, बरेच वस्ताद दिसतां कीं तुम्ही. तेवढ्यावरच ही म्हैस मी तुम्हांला देईन असं वाटलं होय ?"

" बरं मग तुम्हांला काय हवंय् उंदिरमामा ?"

" मला एकदां तुमच्या पालखींत कोण आहे तें पहायचें आहे."

पालखींत राजकन्या झोंपली होती. पालखीवरचा पडदा दूर सारून दादूनें ती सुंदर राजकन्या उंदिरमामांना दाखविली. तिला पहातांच उंदिरमामांना आनंदाच्या नुसत्या उकळ्या फुटूं लागल्या.

मग उंदिरमामा म्हणाले, " हें पहा, माझी एक अट आहे. तुमचं जेवण झाल्यावर ही पालखी येथेंच टाकून तुम्ही सर्वांनीं येथून पळून गेलं पाहिजे. या राजकन्येशीं लग्न करणार आहें मी."

उंदिरमामांच्या त्या बोलण्यानें सर्वांनाच हसूं कोसळलें. म्हैस मिळाल्यामुळें सर्वांनाच अत्यानंद झाला होता.

म्हशीला मारून सर्वांनीं त्या मेजवानीवर आडवा उभा हात मारला आणि मग सर्वांना झोंप अनावर झाली.

ते लोक झोपताहेत असें पाहून उंदिरमामा संतापले.

“ ए ऽ पाजी लोकांनो, जातां कीं नाहीं येथून, कीं घेऊं एकेकाच्या मानगुटीचा चावा.”

पण उंदिरमामांचे ते शब्द कुणालाच ऐकूं गेले नाहींत. कारण प्रत्येकजण ‘ डारडुर ’ करीत घोरत होता.

उंदिरमामांनीं या लोकांचा आतां चांगलाच समाचार घ्यावयाचें ठरविलें. जवळच्या शेतांत जाऊन आपल्या सर्व उंदीरमित्रांना त्यांनीं तेथें येण्याविषयीं विनंती केली. थोड्याच वेळांत हजारों उंदिरांची सेना तेथें येऊन थडकली.

“ हं, कडकडून चावे घ्या या लोकांचे,” उंदिरमामांनीं हुकूम सोडला, “ पण हें पहा, त्या पालखींत झोंपलेल्या मुलीचा मात्र चावा घेऊं नका हो ! ”

“ कां रे बाबा; ती दिसायला मोठी सुरेख आहे म्हणून तिला तूं एकट्यानंच चावायचं ठरविलं आहेस वाटतं ? ” एका उंदरानें विचारलें.

“ ए हेऽरे मूर्खा, अरे ती माझी बायको आहे, समजलास ? बायकोला का कोण कुठं

चावतं ? " सर्व उंदरांनीं हसत खिदळत "च्युं, च्यूं" करीत एकच धुमाकूळ मांडला. उंदीर प्रत्येकाच्या हातापायाला नि मानेला चावूं लागल्यामुळें सर्वजण खडबडून जागे झाले व आरडाओरडा करूं लागले.

उंदिरमामा मोठ्यानें गर्जून त्या लोकांना म्हणाले, " तुम्हांला जीव हवा असेल तर इथून ताबडतोब पळून जा. ही राजकन्या मात्र तुम्हांला आतां मिळणार नाहीं."

आतां सर्वांनाच उंदरांनीं सळो कीं पळो करून सोडलें होतें. त्यामुळें पालखी घेऊन जाण्याची कोणाचीच तयारी नव्हती. एक क्षणही न घालवितां, त्या उंदरांच्या त्रासापासून बचाव करण्यासाठीं सर्वांनीं तेथून पळ काढला. " उंदिरमामा की जय ", " उंदिरमामा झिंदाबाद ", सर्व उंदीर जयघोष करूं लागले.

उंदिरमामांच्या हुकुमाप्रमाणें हजारों उंदरांनीं त्या पालखीभोंवतीं गराडा घातला. मग स्वतः उंदिरमामांनीं पालखीचा पडदा हळूच दूर केला. पालखींत उडी मारून ते एकदम राजकन्येच्या मांडीवरच बसले. तिच्याकडे पाहून उंदिरमामा म्हणतात, " राजकन्ये, चल आतां माझ्या घरीं. तूं माझी बायको आहेस." राजकन्येनें बाहेर

पाहिलें तों हजारों उंदरांनीं तिच्या पालखीला घेरून टाकलें होतें व तिचा एकही माणूस तेथें हजर नव्हता.

राजकन्या घाबरून गेली. हे उंदीर आपल्याला इजा करतील या भीतीनें ती उंदिरमामांच्या मागोमाग चालूं लागली.

★



## ५

मग हजारों उंदीरमित्रांना बरोबर घेऊन वरातीच्या थाटानेंच उदिरमामांची स्वारी त्या रात्रीं आपल्या बिळाकडे परत आली.

" आई, आई, दार उघड " उंदिरमामांनीं मोठ्यानें आईला हांक मारली. रात्रभर झुरळांची शिकार करून आई नुकतीच कुठें झोंपली होती. तिचा डोळा लागतो न लागतो तोंच उंदिरमामांनीं तिची झोंपमोड केली. म्हणून त्रासून ती उत्तरली, " आलास का कारट्या परत मला छळायला. मी नाहीं आतां दार उघडीत. जा, उद्यां सकाळीं ये. "

" अगऽ आई, पण मी बायको आणली आहे, प्रत्यक्ष राजकन्या आणली आहे. तुझ्या सुनेला तरी घरांत घे. "

आई खडबडून उठली आणि बाहेर येऊन तिनें ती हजारों उंदरांची सेना आणि राजकन्या पाहिली, तेव्हां क्षणभर आपण स्वप्नांत तर नाहीं ना, असें तिला वाटलें. आनंदाश्रूंनीं आईचे डोळे भरून आले. तिनें उंदिरमामांना छातीशीं घट्ट धरून त्यांचे किती तरी मुके घेतले. मग उंदिरमामा राजकन्येला म्हणाले, " हं, अशी बाहेर काय उभी राहिलीस. चल आंत माझ्या घरांत. "

" इश्श, एवढ्या लहान बिळांत मला कसं बरं येतां येईल ? "

" अरेच्या तेंही खरच कीं, उद्यां आपण एक मोठा राजवाडा बांधूं हं. आज इथंच झाडाखालीं बसून रहा. "

मग उंदिरमामांनीं आपल्या सर्व उंदिर-सैन्याला मेजवानी द्यावयाचें ठरवून पलीकडलें भाताचें उभें शेत लुटण्याचा हुकूम दिला. दहापांच उंदरांना त्यांनीं आपल्या सेवेसाठीं ठेवून घेतलें.

" आई, आतां मला कारट्या म्हणायचं नाहीं अं. आतां मी राजाचा जांवई आहें. आमच्या महाराजांना मूल नाहीं तेव्हां महाराजांच्या नंतर राजा मीच होणार. आहें कीं नाहीं मी नशीबवान ? "

त्या दिवशीं उंदिरमामांना स्वर्ग दोन बोटें उरला. " मला फार भूक लागली आहे " असें राजकन्येनें सांगतांच ते आपल्या बिळांत गेले आणि त्यांनीं एक हरभऱ्याचा दाणा आणून तिला दिला.

" छे, एवढ्यानं कशी माझी भूक भागेल ? मला तूप-साखर, पोळी असलं खाणं हवं. "

" मोठीच पंचाईत आहे बुवा. पण ठीक, कांहीं हरकत नाहीं. बरं आजच्या दिवस थोडे हिरवे आंबे खाशील

का ?" उंदिरमामा झाडावर चढले आणि त्यांनीं चारसहा हिरवे आंबे तोडून खालीं टाकले. मग उंदिरमामांना एक युक्ति सुचली. त्यांनीं आपल्या चाकरां-कडून बरेचसे आंबे काढविले आणि ते राजकन्येला म्हणाले, "हे आंबे तूं बाजारांत नेऊन वीक आणि येईल त्या पैशांचें काय हवं तें खा. मात्र रात्र पडायच्या आधीं तूं परत आलं पाहिजेस. नाहीं तर तूं असशील तेथून मी तुला पकडून आणीन."

राजकन्या उंदराच्या कचाट्यांतून निस-टायला अतिशय अधीर झाली होती. तिला ही संधि आयतीच मिळाली. राजकन्येनें ते आंबे आपल्या पदरांत गोळा केले आणि राजकन्या बाजाराच्या मार्गाला लागली. उंदिरमामा मोठे धूर्त होते. राजकन्या कोठें तरी पळून जाईल या भीतीनें उंदिरमामाही तिच्या मागोमाग चालले होतेच.

राजकन्या गात होती.

"मी असें राजकन्या हो
परि मूषकजाया बनलें ...."

★

## ६


आपल्या बापाच्या राजवाड्यावरून वरील पालुपद गात ती चालली होती. मुलीचा आवाज राजानें एकदम ओळखला आणि

नोकरांना पाठवून तिला राजानें राजवाड्यांत बोलावून नेलें. मागोमाग उंदिरमामाही राजवाड्यांत गेले. मग राजकन्येनें रात्रीची सर्व हकीकत आपल्या आईबापांना वर्णन करून सांगितली. तेव्हां लगेच उंदिरमामा पुढें येऊन म्हणाले, " राजेसाहेब, तुम्हीं सर्व हकीकत ऐकलीच आहे. आजपासून मी तुमचा जांवई झालों आहें. आतां मला एक थाटाची मेजवानी दिली पाहिजे तुम्हीं. " असें म्हणून उंदिरमामांनीं विजयाचें हास्य केलें.

राजाची राणी मोठी हुषार होती. तिनें या स्वारीची चांगलीच खोडकी जिरविण्याचा विचार केला. ती म्हणाली, " बरं आहे जांवई-बापू, आतां थोडा वेळ इथं बसा. स्वयंपाक झाला कीं मी आंत बोलावीन तुम्हांला. "

राणीनें आंत जाऊन पोळीचा एक लोखंडी तवा विस्तवांत घालून लाल केला. मग बाकी सर्वांचीं पाटपानें करून उंदिरमामांना मात्र पाटाऐवजीं तो तवाच ठेवण्यास तिनें नोकरास सांगितलें. उंदिरमामांना मोठ्या सन्मानानें आंत नेण्यांत आलें. उंदिरमामा गर्वानें नुसते फुगून गेले होते. आंत गेल्यावर मोठ्या अदबीनें उंदिरमामांच्या 'सासूबाई' म्हणाल्या, " जांवईबापू, आपल्यासाठीं त्या तिथं मुद्दाम रंगीत पाट ठेवला आहे. त्यावर आपण बसण्याची तसदी घ्यावी. "

उंदिरमामांना त्या क्षणीं इतका गर्व चढला कीं, यांत कांहींतरी लबाडी असेल असें त्यांच्या मनांतही आलें नाहीं. 'मी मोठा शहाणा' इत्यादि मांडे त्यांनीं मनांतल्या मनांत खाल्ले. पानांत पंचपक्वान्नें वाढलीं होतीं तीं पाहून त्यांच्या तोंडाला पाणी सुटलें होतें. लांब लांब ढेंगा टाकीत ते आपल्या पाटावर जाऊन



बसले मात्र . . . तोंच त्यांचे पाय चांगलेच पोळले. मंडळींत एकच हंशा पिकला व उंदिर-मामा "कँव, कँव, चिंव चिंव" करीत त्या पंक्तींतून वाट फुटेल तिकडे धावत सुटले. पळतां पळतां त्यांना भुई थोडी झाली. कसेंबसें एकदांचें आपलें बीळ त्यांनीं गांठलें आणि आईला घट्ट मिठी मारून ते ओक्साबोक्शीं रडूं लागले. मग आईला त्यांनीं सर्व हकीकत सांगितली. तेव्हां आई त्यांना म्हणाली,

"प्रत्येकानं आपलं सामर्थ्य ओळखून वागलं पाहिजे हें आतां तरी तुला पटलं ना?"

यानंतर अशा भलभलत्या भानगडींत पडण्याचें त्यांनीं सोडून दिलें.

## स्वाध्याय

१. ह्या गोष्टींतील तुम्हांस आवडणारा कोणताही एक प्रसंग संवादरूपानें लिहा.

२. उंदिरमाम्मनें "आपण बायको कशी मिळविली व घालविली." हें आपल्या एका मित्राला पत्र लिहून सांगितलें आहे अशी कल्पना करून एक पत्र तयार करा.

३. प्राणांवर उठणें, तोंडाला पाणी सुटणें, स्वर्ग दोन बोटें उरणें, असले पुष्कळ वाक्प्रचार ह्या गोष्टींत आहेत. त्यांचे अर्थ घरांतील वडील मंडळीकडन किंवा शिक्षकांडून नीट समजून घ्या. असे वाक्प्रचार योजून वाक्यें लि[illegible]

अनुक्रम २९५३२
विभाग म.भा.
क्रमांक ९८०५
नों. दि. २१-५-९१
६३२८
IRBK-0106326